सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक-एडीव्ही ३११६/सीआर-६९/२०१९/तीन दिनांक १४ ऑगस्ट, २०२०

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२० –**
**उमेदवारांना जिल्हा केंद्र निवडण्याची मुभा देण्याबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार प्रस्तुत राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२० चे आयोजन रविवार, दिनांक ५ एप्रिल, २०२० रोजी नियोजित होते. तथापि, कोरोना (COVID-१९) विषाणूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरीता सुरु असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना व लॉकडाऊनचा कालावधी लक्षात घेवून सदर परीक्षा ऐनवेळी पुढे ढकलण्यात आली. दिनांक १२ ऑगस्ट, २०२० रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार सदर परीक्षा **रविवार, दिनांक २० सप्टेंबर, २०२०** रोजी घेण्याचे नियोजित आहे.

**२.** जाहिरातीस अनुसरुन उमेदवारांनी त्यांच्या पसंतीचे जिल्हा केंद्र निवडले असले, तरी सदयस्थितीतील कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावाच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना त्यांच्या पसंतीचे जिल्हा केंद्र निवडण्याची मुभा देण्यात यावी, अशी मागणी उमेदवारांसह लोकप्रतिनिधींकडून आयोगाकडे विविध माध्यमादवारे सातत्याने करण्यात येत आहे. खेडयापाडयातील गरीब व होतकरु उमेदवार, दुर्गम भागातील उमेदवारांना सध्याच्या परिस्थितीमध्ये अन्य जिल्हयांच्या परीक्षा केंद्रावर परीक्षेकरीता उपस्थित राहण्यासाठी उदभवणा-या अडचणी, लॉकडाउनच्या पुर्वी पुणे शहरात आयोगाच्या विविध परीक्षांकरीता मोठया संख्येने पुणे महसुली विभागाबाहेरील उमेदवार अभ्यासाकरीता वास्तव्य करीत होते, कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावामुळे ते आता त्यांच्या मूळ गावी गेले आहेत, ही बाब, सध्याचे प्रवासावरचे व तात्पुरत्या वास्तव्यावरील निर्बंध लक्षात घेता अशा उमेदवारांना आयोगामार्फत दिनांक २० सप्टेंबर, २०२० रोजी आयोजित विषयांकित परीक्षेकरीता पुणे येथे परत येणे कठिण होईल या व इतर प्रशासकीय बाबींचा साकल्याने विचार करुन विषयांकित परीक्षेसाठी **केवळ पुणे जिल्हा केंद्र** निवडलेल्या उमेदवारांना त्यांच्या महसुली मुख्यालयाच्या ठिकाणचे परीक्षा केंद्र निवडण्याची मुभा देण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

**३.** आयोगाच्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल :-

(१) पुणे जिल्हा केंद्र निवडलेल्या उमेदवारांपैकी पुणे महसुली विभागाच्या बाहेरील जिल्हा / शहरांमधील कायमस्वरुपी रहिवासाचा पत्ता नमूद असलेल्या उमेदवारांना त्यांच्या महसुली विभागांच्या मुख्यालयाचे (म्हणजे मुंबई, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व अमरावती) केंद्र निवडण्याची मुभा देण्यात येत आहे.

(२) प्रस्तुत परीक्षेकरिता पुणे जिल्हा केंद्र निवडलेल्या उमेदवारांपैकी पुणे महसुली विभागांतर्गत असलेल्या पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हयांतील कायमस्वरुपी रहिवासाचा पत्ता (Permanent Address) असलेल्या उमेदवारांना जिल्हा केंद्र बदलण्याची मुभा नाही.

(३) वरीलप्रमाणे व्यवस्था कार्यान्वित करण्याकरीता आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईलदवारे दिनांक १७ ऑगस्ट, २०२० रोजी दुपारी १४.०० ते दिनांक १९ ऑगस्ट, २०२० रोजी २३.५९ वाजेपर्यंत उमेदवारांना वरीलप्रमाणे महसुली मुख्यालय असलेले जिल्हा केंद्र निवडण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) जिल्हा केंद्र निवडण्याची मुभा देण्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारांना एसएमएस द्वारे कळविण्यात येईल.

(५) प्रत्येक महसुल विभागाच्या मुख्यालयातील जिल्हा केंद्राची कमाल क्षमता लक्षात घेवून "प्रथम येणा-यास प्राधान्य" (first-apply- first allot ) या तत्वानुसार केंद्र निवडण्याची मुभा असेल. संबंधित केंद्राची कमाल क्षमता संपुष्टात आल्यानंतर त्या केंद्राची निवड उमेदवारांना करता येणार नाही.

**४.** वरील व्यवस्थेप्रमाणे निवडण्यात आलेले केंद्र बदलण्याची विनंती यापुढे कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही सबबीखाली मान्य करता येणार नाही.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग